■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक २९ ● मंगळवार, दि. ९ ते १६ डिसेंबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

# माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी जिल्हा प्रशासन प्रतिबद्ध - अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील

**■ माजी सैनिक कल्याण उपक्रमात वाशिम जिल्हा राज्यात अग्रस्थानी ■ ११३ टक्के निधी संकलन पूर्ण**

**वाशिम,दि.८ डिसेंबर (जिमाका) आपण फक्त ध्वज दिनाचे लक्ष्य पूर्ण केले नाही, तर पुढील वर्षी हे लक्ष्य ओलांडण्याचा निर्धार केला आहे. सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी जिल्हा प्रशासन सदैव कटिबद्ध राहील. असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या विशेष कार्यक्रमात यंदाचा निधी संकलनाचा लक्ष्यांक जिल्हा प्रशासनाने शंभर टक्के पूर्ण केल्याची माहिती देताना त्यांनी नागरिक, शासकीय यंत्रणा, सामाजिक संस्थांचे आभार मानले.**







येत्या नवीन सत्रात उदिष्टांपेक्षा अधिक निधी जमा करून सैनिक कल्याण उपक्रमांना अधिक बळ देण्याचा विश्वास श्री . पाटील यांनी व्यक्त केला. पुढे बोलतांना श्री . पाटील यांनी कठोर परिस्थितीतही निर्धाराने कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांचे वर्णन करतांना वातावरण भावूक झाले. सीमेवर उभा असलेला सैनिक सर्वात आधी देशाची आणि नंतर आपली कुटुंबाची काळजी करतो. त्याच्या कुटुंबियांच्या अडचणी , किंवा अन्य प्रशासनिक कामे सोडवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, असे स्पष्टपणे सांगत त्यांनी सैनिक कुटुंबांना प्राधान्य देण्याची ग्वाही दिली. यावेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विश्वनाथ घुगे, पोलीस उपअधीक्षक धर्मा सोनवणे, सैनिक कल्याण संघटक संजय यलमर, नवोदय विद्यालयाचे प्राचार्य सचिन खरात, जिल्हा उपनिबंधक जी.पी.साबळे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

प्रास्ताविकातून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी जिल्ह्यासाठी राबविण्यात येणाऱ्या सैनिक कल्याण उपक्रमांचा आढावा सादर केला. त्यांनी सांगितले की, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी म्हणून दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत असून आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे आपण जिल्ह्यासाठीचे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पूर्ण केले. माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी आपण प्रतिबद्ध आहोत. जिल्ह्यात एकूण ८५१ माजी सैनिक आहेत .जिल्ह्यात नोंदणीकृत ३७९ माजी सैनिकांच्या ३७० अवलंबितांसह एकूण ४ हजार ९२० आहेत. सुमारे २५० जवान सध्या भारतीय सेनेतील विविध युनिटमध्ये कार्यरत आहेत. दरवर्षी अंदाजे ७ लाख १९ हजार रुपये अनुदान विविध कल्याणकारी योजनांतर्गत वितरित करण्यात येते. पुढे बोलताना श्री.घुगे यांनी सांगितले की, वर्षभरात जागृती कार्यक्रम, प्रचार प्रसिद्धी अभियान, शिबिरे, कल्याणकारी योजनांसाठी अर्ज स्वीकार अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यापुढेही वाशिम जिल्हा सैनिक कल्याण उपक्रमात सदैव अग्रेसर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात, तसेच दहावीहबारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या सैनिकांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी माजी सैनिकांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व समाजाने त्यांच्या कुटुंबीयांसाठी सदैव संवेदनशील आणि मदतशील राहण्याचे आवाहन केले. मान्यवरांच्या हस्ते शहीद जवानांच्या कुटुंबियांचे शाल श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी सैनिक, कार्यरत जवानांचे पालक, स्वयंसेवी संस्था, शालेय विद्यार्थी, नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.संचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी केले. आभार श्री.यलमर यांनी मानले. कार्यक्रमाला शहीद सैनिकांचे पालक,उपस्थित होते.माजी सैनिक, शालेय विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

## नागरिकाभिमुख सेवा देण्यासाठी सर्वांनी जीपीआर प्रणालीचा अचूक व परिणामकारक वापर करावा - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर


# ‘दाखले घरपोच’ उपक्रमाला प्रारंभ होणार

**■ १२ दाखले ऑनलाइन उपलब्ध होणार; जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न**

वाशिम, दि. ६ डिसेंबर (जिमाका) कार्यक्षम आणि पारदर्शक महसूल प्रशासनासाठी तंत्रज्ञानाचा समन्वय अत्यावश्यक आहे.नागरिकाभिमुख सेवा देण्यासाठी सर्वांनी जीपीआर प्रणालीचा अचूक व परिणामकारक वापर करावा. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दि.६ डिसेंबर रोजी जीपीआर प्रणाली संदर्भातील ऑनलाईन प्रशिक्षण सभा आयोजित करण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रशिक्षणाला जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सहायक महसूल अधिकारी तसेच महसूल सहाय्यक यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सक्रिय सहभाग नोंदविला. प्रशिक्षणाच्या प्रारंभी जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल प्रशासनाच्या कामकाजात जीपीआर प्रणालीचे महत्व, भूमी अभिलेख व नोंदींची अचूकता, पारदर्शकता वाढविणे तसेच प्रक्रियांना वेग देणे याविषयी मार्गदर्शन केले.

तांत्रिक पायाभूत सुविधांचा योग्य वापर केल्यास शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी शक्य होईल आणि नागरिकांना सेवा देण्याचा दर्जा उंचावेल असे त्यांनी प्रतिपादन केले. प्रशिक्षणादरम्यान अधिग्रहण, मोजणी, नकाशे अद्ययावत करणे, तांत्रिक माहिती भरण्याची पद्धत, प्रत्यक्ष क्षेत्रीय वापर, डेटा पडताळणी व अहवाल सादरीकरणाची प्रक्रिया यांचे सविस्तर प्रात्यक्षिक देण्यात आले. सादरीकरणातील समस्यांवर उपाययोजना, सामान्य त्रुटी व त्यांना टाळण्याचे मार्ग याबाबतही तज्ज्ञांनी स्पष्टीकरण दिले. तंत्रज्ञान आधारित महसूल व्यवस्थापन हा काळाचा महत्त्वाचा आग्रह असून सर्व अधिकाऱ्यांनी सातत्यपूर्ण प्रगती साधावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री.कुंभेजकर यांनी केले.



प्रशिक्षणातील उपस्थितीचा एकत्रित अहवाल सोमवारी सादर करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले व प्रणालीचा प्रभावी वापर करण्याचा निर्धार व्यक्त केला. सादरीकरण जिल्हा प्रकल्प प्रमुख सौरभ जैन यांनी केले. याबाबत शासनस्तरावरून सदर कार्यप्रणाली लागू करण्यात येणार आहे.

# मानवतावादाचा मुखवटा

कोणताही संघर्ष आतापर्यंत युद्धाने संपलेला नाही आणि कोणताही पेच युद्धाने सुटलेला नाही. तरीही युद्धे सातत्याने घडत असतात आणि त्यात हजारो लोकांचे बळी जातात.अनेक युद्धांत असे दिसले आहे, की फक्त त्यांच्या शस्त्रास्त्र कंपन्यांना युद्धाचा फायदा झाला आहे आणि नागरिकांचे जीव युद्धात गेले आहेत. सध्या ज्वलंत उदाहरण आहे ते रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाचे. युक्रेनमध्ये रोज शेकडो निरपराध नागरिक आपले जीव गमावत आहेत आणि कोणत्या तरी देशाच्या युद्धलालसेपायी आणि सीमा बळकावण्याच्या हव्यासापायी लोकांचे जीव घेत आहेत. यात केवळ शस्त्र कंपन्या मात्र मालामाल होत आहेत. युक्रेन आणि गाझा पट्टीतील युद्धे चर्चेचा विषय बनली आहेत आणि त्यात लक्ष वेधून घेतले आहे ते केवळ शस्त्रे बनवणाऱ्या कंपन्यांनी. एका अहवालानुसार, त्यांची कमाई गेल्या वर्षी ५.९ टक्क्यांनी वाढली आहे. त्यातही अमेरिका आणि युरोपातील कंपन्या आघाडीवर आहेत आणि अमेरिकेतील ३० उदा. लॉकहिड, मार्टिन, नॉर्थ्रॉप ग्रुम्मन आणि जनरल डायनेमिक्स यांसारख्या कंपन्यांना सर्वाधिक लाभ झाला आहे. या कंपन्यांचा एकूण महसूल ३३४ अब्ज डॉलर इतका झाला आहे. अर्थात यात भारतातील तीन कंपन्या समाविष्ट आहेत. सर्वच देश आज मानवतावाद आणि मानवी हक्क याबद्दल बोलतात, पण वैयक्तिक स्तरावर मात्र प्रत्येक राष्ट्र आपल्याकडे जास्तीत जास्त शस्त्र असावीत याच मताची आहेत आणि त्या दृष्टीने त्याचे प्रयत्नही सुरू असतात. अर्थात जागतिक शस्त्रस्पर्धेत आपण मागे पडू अशी भीतीही यामागे असते. त्यामुळे आज भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र आहे, कारण त्याला पाकिस्तानची भीती आहे आणि वेळोवेळी भारताने अण्वस्त्र सज्ज नसल्याचे परिणाम भोगले आहेत. जेव्हा भारत अण्वस्त्र सज्ज नव्हता तेव्हा चिमुकली राष्ट्रेही त्याला डोळे दाखवत होती. आज तशी हिंमत अगदी अमेरिकेकडेही नाही. ती ताकद भारताने प्रयत्नपूर्वक मिळवली आहे. तरीही काही देशांनी स्थापन केलेल्या अण्वस्त्र प्रसारबंदी कराराचा भारत भाग नसला तरीही १९९८ मध्ये पोखरण येथे अणुचाचणी केली आणि त्यानंतर न्यूक्लिअर मोरेटोरियमवर स्वाक्षरी केली. म्हणजे भारत आपल्या अणुबॉम्बचा वापर आपणहून कुणाविरोधात करणार नाही असा तो करार होता. पण कंपन्यांच्या शस्त्रास्त्र स्पर्धा तीव्र झाल्या आहेत आणि त्यात सर्वच देशांच्या शस्त्र कंपन्या आहेत. रशिया, पश्चिम आशिया येथे सतत युद्धजन्य परिस्थिती असते आणि तेथे शस्त्रांची विक्री वाढली आहे. ईस्रायल आज जगातील सर्वात ताकदवान राष्ट्र आहे आणि ते तर सर्व बाजूंनी शत्रुराष्ट्रांनी वेढले आहे. त्यामुळे त्याला काहीही वाटले तरीही शस्त्रसज्ज होण्याची आवश्यकता आहे. हे सारे समजून घेतले तर शस्त्र कंपन्यांच्या मालामाल होण्यामागील अर्थकारण कळू शकते. या शस्त्रास्त्र कंपन्या आणि त्यांच्यातील स्पर्धा यामुळे जागतिक अर्थकारणावर होणारा परिणाम तर दिसतोच आहे. पण तो अपरिहार्यही आहे. कारण आज जगाला केवळ ताकदीची भाषा कळते. भारताकडे जेव्हा सामर्थ्य नव्हते तेव्हा लहान देशही भारताला डोळे दाखवत असत.आज ती हिंमत कुणाकडेही नाही. भारताने ती ताकद कमावली आहे आणि हीच भाषा जगाला कळते. त्यामुळे शस्त्र कंपन्या मालामाल झाल्या तरीही कोणताही देश आज दुसऱ्याच्या हातातील बाहुले नाही हे आजच्या जगाचे वास्तव आहे. जागतिक अर्थशास्त्राचा टीकात्मक पैलू असा आहे, की शस्त्र उत्पादन कितीही नफाखोर असले तरीही त्यात अंति मानवतेचा मुडदा पडतो. विशेषतः जेव्हा युद्धाच्या काळात हे जास्त प्रकर्षाने समोर येते. मानवी आयुष्य जेव्हा हरवते तेव्हा शस्त्र कंपन्या मालामाल होत असतात. त्याला कुणाचाही इलाज नाही.

## पाटील महाविद्यालयात एड्स जनजागृतीपर निबंध स्पर्धा



रिसोड : स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ.एम.एन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबीन क्लब ग्रामीण रुग्णालय रिसोड यांच्या संयुक्त विद्यमाने ०६ डिसेंबर २०२५ रोजी एड्स सप्ताह निमित्ताने एच आय व्ही/एड्स संक्रमणाचे मार्ग व प्रतिबंधात्मक उपाय ' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.


स्पर्धेला सुरुवात करण्यापूर्वी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांनी एड्स हा रोग संपूर्ण जगामध्ये पसरलेला असून रोगाच्या नियंत्रणासाठी जनजागृती करणे महत्त्वाचे असल्याचे मत प्रतिपादन केले. निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विशाल आटोळे, द्वितीय क्रमांक विनोद कल्याणकर, तृतीय क्रमांक कु.वैष्णवी खोलगडे यांनी प्राप्त केले. सदर स्पर्धेचे परीक्षण समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रमेश मोरे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.केशव कोकाटे व महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.छाया खिल्लारे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या प्रसंगी कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद,राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक-सेविका बहसंख्येने उपस्थित होते.वि.प्र.

## रिसोड कृषी महाविद्यालयामध्ये जागतिक मृदा दिन साजरा



रिसोड : डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित कृषी महाविद्यालय रिसोड येथे ५ डिसेंबर ला जागतिक मृदा दिनाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आशिष आपतुरकर यांची तर विशेष अतिथी व मार्गदर्शक म्हणून राजेश डोरे कीटक शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिम तथा तांत्रिक समन्वय कृषी महाविद्यालय रिसोड यांची उपस्थिती लाभली इतर उपस्थित मान्यवरांमध्ये महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉक्टर परमेश्वर देवढे मृद विज्ञान शाखा कृषी महाविद्यालय रिसोड चे विभाग प्रमुख प्राध्यापक निलेश खडसे यांच्यासह इतर प्राध्यापकांची उपस्थिती लाभली.

सर्वप्रथम दीप प्रज्वलनानंतर मृद विज्ञान शाखेचे प्राध्यापक निलेश खडसे यांनी जागतिक मृदा दिन कार्यक्रम आयोजना संदर्भात प्रास्ताविक सादर केले व सहभागी विद्यार्थ्यांनी जमिनीचे आरोग्य अबाधित राखण्या संदर्भात आव्हान केले याप्रसंगी विशेष मार्गदर्शनामध्ये राजेश डोरे यांनी जमिनीच्या आरोग्य संदर्भामध्ये विविध शास्त्रोक्त बाबींचे शास्त्रोक्त विवेचन केले व जमिनीचे आरोग्य अबाधित राखण्याकरिता मूलस्थानी जलसंधारण माती परीक्षणाच्या आधारावर एकात्मिक अन्नद्रव्यव्यवस्थापन तसेच जमिनीमधील सेंद्रिय कर्ब वृद्धीकरिता अमलात आणावयाच्या उपाययोजना याविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले डॉ परमेश्वर देवढे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांनी जमिनीचे आरोग्य संदर्भात इतर शेतकऱ्यांमध्ये जनजागरण करावे असे सांगितले आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शन मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आशिष अपतुरकर यांनी प्रत्येक कृषी पदवी मध्ये प्रवेश घेणाऱ्या व पदवीधर विद्यार्थ्यांनी आपल्या शेतातील जमिनीची आरोग्य पत्रिका वेळोवेळी अद्ययावत करून जमिनीच्या आरोग्य पत्रिकेच्या आधारावरच खतांचे शेतामध्ये अन्नद्रव्याचे व्यवस्थापन करावे असे उपस्थित विद्यार्थ्यांना आव्हान केले याप्रसंगी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी राजश्री धुराडे हिने जमिनीच्या आरोग्यावर एक काव्य सुद्धा सादर केले. संचालन प्राध्यापक एल बी काळे यांनी तर आभार प्राध्यापक निलेश खडसे यांनी केले शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले वि. प्रा



पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालय अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# रिसोड शहरात शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

रिसोड: ममता आणि मधुसुदन अग्रवाल फाउंडेशन, मुबई तसेच 'संजीवनी ममता हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने २३ ते ३० नोव्हेंबर दरम्यान झालेल्या मोफत मेगा गुडघा व नितंब प्रत्यारोप शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरात एकूण २३३५ रुग्णाची तपासणी झाली यापैकी १४९३ रुग्णांचे एक्स-रे काढले व त्यामधून ४५१ रुग्ण हे शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले असून या रुग्णाची शस्त्रक्रियेसाठी तयारी असता त्यांची ३१ मार्चपूर्वी मोफत शस्त्र करण्याचे उद्दिष्ट आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात गुडघा व नितंब शिबिराचे आयोजन हा एक विक्रम असून याची दखल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या संस्थेने घेतली असून यापूर्वी २५ तारांमध्ये २५० हिप व नी रुग्णांच्या तपासणीचा विक्रम होता. ममता आणि मधुसूदन फाउंडेशन तर्फे २७ नोव्हेंबर ला दुपारी एक ते २८ नोव्हेंबर दुपारी एक पर्यंत या २४ तासात ५१२ रुग्णाची तपासणी करण्यात आली हा एक विक्रम असून याची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या संस्थेतर्फे लवकरच अधिकृत घोषणा होणार असल्याचे कळते.



फाउंडेशनचे अध्यक्ष मधुसुदनजी अग्रवाल यांच्याकडून समाजोपयोगी उपक्रम म्हणून हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. समता सर्वरव आरोग्य सेवा केंद्र येथे संपन्न झालेल्या शिबिरात विदर्भ, मराठवाडा व खानदेश परिसरातील गुडघा व नितंब समस्यांनी ग्रस्त असलेले रुग्ण मोठ्या संख्येने आले होते. रुग्णांसाठी हे शिबिर वरदान ठरले असून रुग्णाची शस्त्रक्रिया संजीवनी ममता हॉस्पिटल मुबई येथे पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेशिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची प्रगत तपासणी करण्यात आली. रुग्णांना अत्याधुनिक मॉडेल एक्स-रे, आवश्यक वैद्यकीय तपासण्या तसेच तज्ञ डॉक्टराचे सल्लामसलत सत्र वैज्ञानिक पद्धतीने तपासणी तसेच तज्ञांचे मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात जगप्रसिद्ध गुडघा प्रत्यारोपण शल्यविशारद व २८००० हून अधिक गुडघा-नितंब प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केलेले डॉ. नारायण खंडेलवाल तसेच प्रसिद्ध ऑर्थोपेडिक विशेषज्ञ डॉ. शारिक अन्सारी शिबिरामध्ये उपस्थित होते. शिबीर यशस्वी होण्यासाठी डॉ अक्षय देशमुख, डॉ मुकुंद व्यवहारे, डॉ अजय नाईकवाडे, डॉ पंकज वाघ, डॉ सागर ठाकूर, डॉ गजानन बगडिया, डॉ प्रशांत आटोळे, डॉ गिरीश बगडिया यानी सहकार्य केले. शिबिराची कोऑर्डिनेटर म्हणून डॉ.अजय पाटील शिबिरात पूर्ण वेळ उपस्थित होते. ता.प्र.

# प्रा. राम शिंदे व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी घेतला हिवाळी अधिवेशन तयारीचा आढावा



नागपूर : महाराष्ट्र विधिमंडळाच्या २०२५ च्या (हिवाळी) अधिवेशनासाठी आवश्यक सर्व यंत्रणा सज्ज आहेत, याची खात्री करण्यासाठी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे व उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विधानभवनात सविस्तर आढावा बैठक घेतली. सोमवारपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत अधिवेशन काळात कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी तातडीने आणि सक्षम नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी सर्व संबंधित विभागांना दिल्या.

मंत्रीपरिषद सभागृहात झालेल्या या बैठकीला विधानमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे, श्रीमती मेघना तळेकर, वि. गो. आठवले, शिवदर्शन साठे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिवेशनामध्ये सहभागी होणारे मंत्री, आमदार, तसेच विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांना आवश्यक सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही वेगाने करण्याचे निर्देश सभापती व उपसभापती यांनी दिले.

विधानभवनासह अधिवेशनाशी संबंधित सर्व इमारतींच्या वीजपुरवठ्याची चाचणी पूर्ण झाली असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी विशेष मनुष्यबळ तसेच पर्यायी जनरेटर प्रणाली उभारण्यात आली आहे. विधानमंडळ परिसरात पार्किंग स्लॉटची व्यवस्था करण्यात आली असून वाहतूक सुसूत्रिकरणाबाबत संबंधित यंत्रणांना स्पष्ट दिशा देण्यात आली. विधानभवनात हिरकणी कक्षाची व्यवस्था आहे.

अधिवेशन कालावधीत दूरध्वनी, इंटरनेट व वायफाय सेवा अखंडित सुरू राहतील. नागभवन, रविभवन व आमदार निवास येथे २४ तास ॲम्ब्युलन्स तसेच अतिरिक्त वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. सुरक्षा यंत्रणांनी विधानभवन परिसरातील आतल्या-बाहेरच्या सुरक्षा बंदोबस्ताचा आढावा घेऊन आवश्यक पोलिस पथके तैनात केली आहेत. अधिवेशनात व्हीआयपींना भेटण्यासाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी 'पास' सक्तीने घ्यावा लागेल, असे स्पष्ट करतानाच विनापास प्रवेशाची समस्या रोखण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनाची असल्याचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'लोकराज्य' दुर्मिळ अंक प्रदर्शनाला भेट देत त्यांनी प्रदर्शनातील विविध महत्त्वपूर्ण दस्तऐवजांची माहिती घेतली. बैठकीनंतर सभापती प्रा. राम शिंदे आणि उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी विधानपरिषद व विधानसभेच्या सभागृहांना प्रत्यक्ष भेट देऊन कामकाजासाठी आवश्यक सर्व तांत्रिक व भौतिक सुविधा याबाबत सखोल तपासणी केली.

## लऊळसह चार गावांचा वीजटंचाईचा प्रश्न संपुष्टात

**कुर्डूवाडी / सोलापूर :** माढा तालुक्यातील लऊळ, उजनी (मा)., पडसाळी व भुताष्टे या चार गावासाठी भेडसावणारा विजेचा प्रश्न आता संपुष्टात आला असून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी व योजनेच्या ऊर्जा प्रकल्प अंतर्गत विद्युत सब स्टेशन उभारणीस लऊळ येथे अधिकृत जागा उपलब्ध झालेली आहे. याबाबतीचा याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश प्राप्त झाला आहे. त्यामुळे आगामी थोड्याच कालावधीत या ठिकाणी विद्युत सबस्टेशन प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याची माहिती माढा तालुक्याचे माजी आमदार बबनदादा शिंदे यांनी दिली आहे.



## पंतप्रधान आज लोकसभेत चर्चेला सुरुवात करतील

# वंदे मातरम् दिनानिमित्त चर्चा!

**नवी दिल्ली :** संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. वंदे मातरमच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त ८ डिसेंबर रोजी संसदेत एक विशेष चर्चेचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चेदरम्यान, राष्ट्रगीताशी संबंधित अनेक महत्त्वाचे आणि ऐतिहासिक तथ्ये, जी अनेक लोकांना माहिती नाहीत, ती सभागृहासमोर मांडली जातील. एएनआयने सूत्रांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी दुपारी १२ वाजता लोकसभेत चर्चेला सुरुवात करतील. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह देखील समारोपीय भाषणाने चर्चेचा समारोप करतील. गृहमंत्री अमित शहा राज्यसभेत चर्चेला सुरुवात करतील अशी अपेक्षा आहे. संसदेत वंदे मातरमवरील चर्चेदरम्यान काँग्रेसचे आठ नेतेही बोलणार आहेत. या यादीत लोकसभेतील विरोधी पक्षाचे उपनेते गौरव गोगोई, प्रियांका वड्रा, दीपेंद्र हुडा, बिमल अकोइजाम, प्रणिती शिंदे, प्रशांत पडोळे, चमला रेड्डी आणि ज्योत्स्ना महंत यांचा समावेश आहे.

### वंदे मातरम्‌चा १५० वा वर्धापन दिन

संसदेचे हिवाळी अधिवेशन १ डिसेंबर रोजी सुरू झाले आणि ते १९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. ७ नोव्हेंबर रोजी राष्ट्रगीत 'वंदे मातरमला १५० वा वर्धापन दिन होता. बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी रचलेले 'वंदे मातरम' हे प्रथम ७ नोव्हेंबर १८७५ रोजी 'बंगदर्शन' या साहित्यिक मासिकात प्रकाशित झाले. १८८२ मध्ये, हे गाणे बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या 'आनंदमठ' कादंबरीत समाविष्ट करण्यात आले. रवींद्रनाथ टागोर यांनी ते संगीतात रचले आणि स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांसाठी ते एक प्रमुख आरोळी बनले. २४ जानेवारी १९५० रोजी भारत सरकारने वंदे मातरमला राष्ट्रीय गीताचा दर्जा दिला.

# संत तुकाराम महाराजांचे विचार जगनाडे महाराजांनी सर्वदूर पोहोचविले - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर, दि. ८ : काही रुढीवादी लोकांनी संत तुकाराम महाराज यांच्या गाथा पाण्यात बुडविल्या, मात्र संत जगनाडे महाराज यांनीच त्या गाथा वाचवून तुकाराम महाराजांचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

कौशल्य विकास विभागांतर्गत रामदासपेठ येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत जगनाडे महाराज यांचे नाव देण्यात आले,

यावेळी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, माजी खासदार रामदास तडस अतिथी म्हणून उपस्थित होते. भक्ती संप्रदाय, वारकरी परंपरा ही महाराष्ट्राची ओळख असल्याचे सांगून मुख्यमंत्री

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण

श्री. फडणवीस म्हणाले की, वारकरी संप्रदायाने उच्च नीच भाव संपवून अवघा महाराष्ट्र एक केला. या मालिकेत संत जगनाडे महाराज यांचे कार्य अतिशय मोठे आहे. समाजातील मनुष्यता जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले. फ

राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना महापुरुषांची नावे देण्याच्या उपक्रमाचीही मुखमंत्र्यांनी प्रशंसा केली. मुख्यमंत्र्यांचे कार्यक्रम स्थळी आगमन होताच औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. संस्थेच्या विद्यार्थिनींनी यावेळी लेझीम नृत्य सादर केले. संत जगनाडे महाराज यांच्या वेशभूषेत सर्वांचे सहभागी विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# संत तुकाराम महाराज विद्यालयात जवाहर नवोदय सराव परीक्षा उत्साहात

रिसोड : येथून जवळच असलेल्या कंकरवाडी येथील संत तुकाराम महाराज विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात जवाहर नवोदय सराव परीक्षेचे आयोजन ३०नोव्हेंबर रविवारला करण्यात आले. यावेळी जवाहर नवोदय सराव परीक्षेसाठी एकूण ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यप्रसंगी संत तुकाराम महाराज विद्यालय व संत गजानन महाराज कनिष्ठ महाविद्यालयात परीक्षा केंद्राचे आयोजन करण्यात आले.

सदरहू परीक्षेचे आयोजन जय जवान जय किसान पोलीस अकॅडमी व स्वस्तिक कोचिंग क्लासेस रिसोड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या परीक्षेसाठी विविध शाळेचे व कोचिंग क्लासेस वर्ग ५वीचे विद्यार्थी वाशिम ,बुलढाणा व हिंगोली जिल्ह्यामधून प्रविष्ट झाले होते. यावेळी स्वस्तिक क्लासेसचे प्रदीप पायघनसर ,भगवान सानपसर व जय जवान जय किसान पोलीस अकॅडमीचे प्रवीणजी ढवणे, नागेशजी देवकर व त्यांचे सर्व चमू यांनी उत्कृष्ट रीतीने परीक्षेचे आयोजन करू उत्तम रीतीने परीक्षा सुरळीत पार पाडली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचा निकाल तयार करण्यात आला. त्यानंतर बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी संत तुकाराम महाराज विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष



श्रीकृष्णजी ढेकळे अध्यक्ष म्हणून तर प्राचार्य साहेबराव जाधव स्वागत अध्यक्ष म्हणून होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून देव्हड ग्रामपंचायत अधिकारी, मॉडर्न सायन्स कॉलेजचे अध्यक्ष नारायणजी काकड , प्रवीण ढवणे महाराष्ट्र पोलीस, बँक कर्मचारी वासुदेव नुके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी श्रीकृष्ण ढेकळे यांनी आपले अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी अधिक मेहनत घेऊन आपले नाव रोशन करावे असे आवाहन केले. जिल्हा परिषद शाळा बोरखेडी शाळेचा विराट वासुदेव मुके याने ८० पैकी ७९ गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला त्याला पाच हजार रुपयांचे रोख बक्षीस देऊन त्याचा व त्याच्या वडिलांचा सत्कार करण्यात आला. तर दुसरा क्रमांक सुद्धा याच शाळेचा विद्यार्थी शिवांश रुद्राश कव्हरे याने चार हजार रुपयांचे बक्षीस मिळविले. तर तिसरा येण्याचा मान जिल्हा परिषद शाळा कन्हेरी ईश्वरी विलासराव यादव हिला मिळाला. तिला तीन हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. त्यानंतर चार विद्यार्थ्यांना प्रत्येकी चौदाशे रुपये साक्षी भिसे, समर्थ राऊत, यशश्री स्वामी व शिवाजी सोनवणे यांनी ७७ गुण घेऊन चौथा क्रमांक मिळवला. तर पाचवा ऋषभ हिवराळे ९०० रुपये तसेच १५ विद्यार्थ्यांनी ७५ च्या वर गुण मिळवले होते. त्यांना प्रत्येकी ७५० रुपये तसेच तीनशे प्रमाणे प्रत्येकी बक्षीस देण्यात आले. स्वस्तिक क्लासेसचे प्रदीप पायघन भगवान सानप व त्यांची सर्व टीम तसेच महाराष्ट्र पोलीस नागेश देवकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी अतिशय परिश्रम घेतले. यावेळी शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर बांधवांनी या सराव परीक्षेसाठी सहकार्य केले. यावेळी गिरा काष्ट सावंत , घोडेकर , सुळे सावंतसर, झनकसर, शिंदे यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य साहेबराव जाधव यांनी केले. तर सूत्रसंचालन पायघन तर आभार नागेश देवकर यांनी मानले. श.प्र.

## शेतकऱ्यांनी ई-केवायसी त्वरित पूर्ण करावी — तहसीलदार तेजनकर

रिसोड : अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदानाची रक्कम वेळेवर प्राप्त व्हावी, यासाठी प्रशासन सतत प्रयत्नशील आहे. मात्र अद्यापही ४१५७ शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रलंबित असल्यामुळे त्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा होणे बाकी आहे, अशी माहिती तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी दिली.



तहसीलदार तेजनकर यांनी सांगितले की, ज्यांचे व्ही के क्रमांक प्राप्त झाले आहेत परंतु खात्यात रक्कम जमा झालेली नाही, अशा शेतकऱ्यांनी त्वरित ई-केवायसी करून घेणे आवश्यक आहे. ई-केवायसी नसल्यास शासनाच्या कोणत्याही योजनेतील थेट लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करता येत नाही.

शेतकऱ्यांनी नजिकच्या सेतू केंद्रात जाऊन आपला व्ही के नंबर विशिष्ट क्रमांक सांगून ई-केवायसी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी केले.

प्रशासनाच्या वतीने अनुदान वाटपाची प्रक्रिया सुरु असून ई-केवायसी पूर्ण न करणाऱ्या शेतकऱ्यांमुळे अनुदानाचे वितरण विलंबित होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.'सध्या ई-केवायसीसाठी महाऑनलाईनची साईट सुरळीत सुरू असून केवायसी करु घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. **श.प्र.**

## ई-केवायसीसाठी तहसील प्रशासन अलर्ट मोडवर




महाऑनलाईनची साईट सध्या सुरळीत सुरू असून तहसील कार्यालयाच्या वतीने शेतकऱ्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आले आहेत. तसेच अजूनही ई-केवायसी राहिलेल्या शेतकऱ्यांच्या याद्याही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.
त्यामुळे शेतकऱ्यांनी विलंब न करता जवळच्या सेवा केंद्रात जाऊन आपली ई-केवायसी तातडीने पूर्ण करावी.
रुपेश बाजड
केंद्र चालक - रिसोड

रिसोड : अतिवृष्टीचे अनुदान मिळावे यासाठी ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. मात्र अजूनही अनेक शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रलंबित असल्याने अनुदान वितरणात अडथळे निर्माण होत आहेत. शेतकऱ्यांना लवकरात लवकर अनुदान मिळावे यासाठी तहसील प्रशासन अलर्ट मोडवर काम करत आहे.

तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली, नायब तहसीलदार टी. डी. कुलमेथे यांच्या पुढाकारातून, नायब नाझर सुधाकर पडघान महसूल सहायक गजानन देशमुख यांच्यासह महसूल विभागाचे संपूर्ण पथक ठिकठिकाणी जाऊन ई-केवायसी मोहिम राबवत आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की त्यांनी लवकरात लवकर ई-केवायसी पूर्ण करावी. शेतकऱ्यांनी जवळच्या महा ई-सेवा केंद्र, आदर्श आपले सरकार सेवा केंद्र, तसेच सेतू केंद्रात जाऊन आवश्यक कागदपत्रांसह ई-केवायसी पूर्ण करावी. यामुळे अतिवृष्टी अनुदानाचा लाभ तातडीने त्यांच्या बँक खात्यात जमा होऊ शकेल. ष

नायब तहसीलदारांकडून प्रत्यक्ष भेटीशेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी महसूल प्रशासन सक्रियअसून अनेक शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित का आहे, याची संपूर्ण चौकशी नायब तहसीलदार टी. डी. कुलमेथे यांनी केली. राहिलेल्या शेतकऱ्यांनी त्वरित ई-केवायसी करून घ्यावी, असेही त्यांनी आवाहन केले. श.प्र.

## रिठद येथील 33 विद्युत उपकेंद्रातील रोहीत्र तोडले

रिसोड : तालुक्यातील रिठद येथील ३३ के. व्हि. विद्युत उपकेंद्रातील बाजूला काढून ठेवलेल्या ५ ईंचे रोहित्र इतर ठिकाणी हलवण्यात येत असतांना ते बाहेर काढण्यासाठी ३३ के. व्हि. विद्युत उपकेंद्रातील कंपाऊंड म्हणून असलेले तार व लोखंडी गेट तोडावे लागले.



या अगोदर १० ईं चे रोहित्र बसवण्यासाठी याच गेट मधून ५ ईंचे रोहित्र बाजूला काढण्यासाठी याच गेट मधून काढले होते त्यावेळी कोणतीही तोडफोड केली नाही. किंवा बसवण्यासाठी व काढण्यासाठी अडचण आली नाही व निर्माणही झाली नाही. परंतु तोच रस्ता तेच गेट मग गेट कशासाठी तोडले? हा प्रश्न निर्माण झाला. आता तेच गेट व तेच तार कंपाऊंड पुन्हा बसवण्यासाठी त्यालानवीन बनवण्यासाठी खर्च येणार? त्यामुळे झालेल्या नुकसानीची व नव्याने बसवण्यासाठी येणाऱ्या खर्चास कोण जबाबदार? हा प्रश्न सुद्धा ऐरणीवर आला आहे. याबाबत वरिष्ठ दखल घेतील किंवा नुकसानी जबाबदार असलेल्या संबंधितांची पाठराखण करतील हे येणारा काळच ठरवेल. आणि हे पाहणे औसुख्याचे ठरणार आहे. श.प्र.

## जलदगती न्यायालयाद्वारे 138 प्रकरणे निकाली

### खटले निर्णयाप्रत नेण्यासाठी केंद्राची योजना

**पणजी :** राज्यातील एकमेव जलदगती न्यायालयाने आतापर्यंत १३८ प्रकरणे निकाली काढली आहेत. यामध्ये १०४ प्रकरणे बलात्कार आणि पोक्सोची, तर ३४ केवळ पॉक्सोची प्रकरणे होती. ३० सप्टेंबर २०२५ अखेरीस जलदगती न्यायालयात १४१ प्रकरणे प्रलंबित होती. केंद्रीय न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लोकसभेत दिलेल्या लेखी उत्तरातून ही माहिती मिळाली आहे. याबाबत खासदार दामोदर अग्रवाल यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

उत्तरातील माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ऑक्टोबर २०१९ मध्ये केंद्र सरकारने जलदगती विशेष न्यायालयांसाठी विशेष योजना सुरू केली होती. यामध्ये विशेष पोक्सो न्यायालयांचा समावेश



होता. याद्वारे बलात्कार आणि पॉक्सोचे खटले लवकरात लवकर निकाली लावण्यात येत आहेत. या योजनेला आतापर्यंत दोनवेळा मुदतवाढ दिली आहे. सध्या योजनेला ३१ मार्च २०२६ पर्यंतची मुदतवाढ दिली आहे. याद्वारे देशभरात एकूण ७९० न्यायालये स्थापन करण्याचा हेतू आहे. आतापर्यंत केंद्राने या योजनेसाठी राज्यांना १,२०७ कोटी रुपयांची मदत दिली आहे. ३० सप्टेंबर २०२५ अखेरीस देशभरातील विविध राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशात ७७३ जलदगती न्यायालये उभारण्यात आली आहेत. याद्वारे ३.५० लाखांहून अधिक खटले निकाली लावण्यात आली आहेत. यातील २.२५ लाख खटले हे विशेष पॉक्सो न्यायालयाने निकाली लावली आहेत. गोव्यात पोक्सो न्यायालयाने २०२२ मध्ये ४४, २०२३ मध्ये ३०, २०२४ मध्ये २७, तर ३० सप्टेंबर २०२५ अखेरीस १९ खटले निकाली लावल्याचे उत्तरात नमूद केले आहे. उत्तरातील माहितीनुसार, राज्यातील विशेष न्यायालयात २०२३ अखेरीस १४ खटले २ वर्षांहून अधिक काळासाठी प्रलंबित होते.

त्या वर्षी संपूर्ण देशात दोन वर्षांहून अधिक काळासाठी प्रलंबित असणाऱ्या खटल्यांची संख्या सुमारे ३५ हजार इतकी होती.

# विधिमंडळ हिवाळी अधिवेशन-२०२५ ‘दुरध्वनी पुस्तिका’ प्रकाशित

- **माहिती विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते प्रकाशन**
- **क्यू. आर. कोडमुळे डिजिटल पुस्तिका सहज उपलब्ध**

नागपूर दि.८ : महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे तयार करण्यात आलेल्या 'हिवाळी अधिवेशन २०२५ दूरध्वनी पुस्तिके'चे प्रकाशन आज माहिती विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते करण्यात आले.

नागपूर येथे अधिवेशनाकरिता येणाऱ्या राजकीय प्रतिनिधी, अधिकारी, पत्रकार व नागरिकांना संबंधित शासकीय यंत्रणेशी सुलभ आणि त्वरित संपर्क साधता यावा, या उद्देशाने ही विस्तृत मार्गदर्शिका तयार करण्यात आली असून संबंधितांना ही उपयुक्त ठरेल असे ब्रिजेश सिंह यांनी याप्रसंगी सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते या दूरध्वनी पुस्तिकेच्या क्यू आर कोड चेही प्रकाशन करण्यात आले. या क्यू आर कोडमुळे संपूर्ण दूरध्वनी पुस्तिका आता डिजिटल स्वरूपात सहजपणे ऑनलाईन उपलब्ध झाली आहे, ज्यामुळे पुस्तिका छापाईसाठी लागणाऱ्या शासनाच्या निधीतही मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे.

या दूरध्वनी पुस्तिका निर्मितीसाठी गडचिरोलीचे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव, नागपूर माहिती विभागातील सहायक संचालक पल्लवी धारव, माहिती अधिकारी रितेश भुयार, माहिती अधिकारी अतुल पांडे तसेच माध्यम समन्वयक अनिल गडेकर आणि शासकीय मुद्रणालयाचे सहकार्य लाभले.